संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# डॉ. काकोडकरांचा लोकशाही संवर्धनाचा विचार

**जगप्रसिध्द** विचारवंत मार्क ट्वेन याने एका ठिकाणी असे म्हटले होते की, जगामध्ये दोन प्रकारचे लोक आढळून येतात. त्यातल्या पहिल्या प्रकारातल्या लोकांना आपली सगळी कौशल्ये पणाला लावून त्यांना अभिप्रेत असलेल्या गोष्टी ते प्राप्त करून घेतात. तर दुसऱ्या प्रकारचे लोक गोष्टी प्राप्त झाल्याचा फक्त दावा करतात. समाजाला किंवा देशाला आज पहिल्या प्रकारच्या लोकांची जास्त गरज असते. मार्क ट्वेनचे हे उदगार अतिशय सार्थ आहेत. भारतातही असे पहिल्या प्रकारातले लोक फार कमी प्रमाणात आढळतात. ज्यांनी आपले कौशल्य पणाला लावून देशासाठी काही गोष्टी प्राप्त करून दिल्या. अशा लोकांच्या मांदियाळीत ज्येष्ठ शास्त्रज्ञ अनिल काकोडकर यांचे नाव अग्रक्रमाने घेता येते. विशेष म्हणजे आता अणू ऊर्जा आयोगाच्या निवृत्तीनंतरही आपल्या देशात आणखी काही चांगले घडावे, यासाठी ते प्रयत्न करताना दिसतात. त्यांच्या बोलण्यातून, भाषणांमधून ती तळमळ लक्षात येते. अलीकडेच मुलुंड पूर्व भागातल्या व्हीपीएम आर झेड शहा कॉलेजच्या पदवीदान समारंभाला ते उपस्थित होते. यावेळी त्यांनी केलेले भाषण हे राज्यकर्त्यांसाठी, विद्यार्थ्यांसाठी, शिक्षण संस्थांसाठी एक चिंतनाचा विषय ठरू शकते. एके काळी नालंदा आणि तक्षशीला यासारख्या जगतमान्य विद्यापीठांची परंपरा भारताला लाभली. जगाच्या अनेक भागातून अनेक अभ्यासक या विद्यापीठात अध्ययनासाठी येत असत. आज परिस्थिती उलट झाली आहे. हा लौकिक भारताला पुन्हा प्राप्त करता येऊ शकतो. मात्र याकरिता काळाने उपलब्ध करून दिलेल्या विज्ञान तंत्रज्ञानाचा समर्पकपणे उपयोग केला पाहिजे. प्राचीन काळी असलेल्या गुरुकुल पध्दतीचा काही प्रमाणात वापर करून भारतातल्या शिक्षण संस्था यादेखील जगतमान्य होऊ शकतात. हे सांगताना काकोडकर यांनी काही महत्त्वाची उदाहरणेही दिली. त्यांच्या या सूचना अतिशय मुलगामी स्वरूपाच्या ठरतात. ज्याकडे शिक्षण तज्ज्ञांचे आणि राज्यकर्त्यांचेही लक्ष गेलेले नाही. विद्यार्थ्यांमधल्या संशोधनाला किंवा नैपुण्याला योग्य आकार द्यायचा असेल तर त्याची सुरुवात शालेय स्तरावरून व्हायला हवी. किंवा विद्यापीठ स्तरावरच त्यांना संशोधनाच्या एकत्रित संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. आज पदवी घेतल्यानंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमात विद्यार्थ्याला संशोधक म्हणून संधी दिली जाते. हा केवळ वेळेचा आणि शक्तीचा अपव्यय आहे. पदवी घेत असतानाच विद्यार्थ्यांकडून संशोधनात्मक अभ्यास झाला तर त्या विद्यार्थ्यामधला आत्मविश्वास तर वाढतोच किंवा एक तज्ज्ञ, संशोधक लवकर प्राप्त होऊ शकतो.

### विद्यार्थ्यांची संशोधक वृत्ती

काकोडकरांची ही सूचना खरे तर वेगाने अंमलात आणण्यासारखी आहे. पदवीपर्यंतचे म्हणजे वयाच्या विसाव्या वयापर्यंतचे त्यांचे शिक्षण हा वेळ आणि शक्तीचा बऱ्यापैकी अपव्यय ठरत असतो. काकोडकरांनी स्वतःमधली कौशल्ये प्राप्त करून घेतली आणि समाजाला ती समर्पित केली. त्यांचे हे अनुभवाचे बोल खूप मोठा संदेश देऊन जातात. आपल्या याच भाषणात काकोडकरांनी असाच एक मूलभूत मुद्दा सांगितला की, आज जगभर विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रसार झालेला आहे. परंतु, भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण भागापर्यंत तो पोहचलेला नाही. शिक्षण घ्यायचे असेल तर शहरात येऊनच मिळू शकते किंवा उद्योग व्यवसाय करायचा असेल तर शहरातच करता येतो. हा प्रकार थांबला पाहिजे. त्या त्या भागाची गरज आवश्यकता लक्षात घेऊन खेड्यापर्यंत तिथल्या माणसाला किंवा शहरातल्या माणसाला खेड्यात जाऊन उद्योग उभारणीची संधी मिळाली पाहिजे. तंत्रज्ञानाचा ग्रामीण भागापर्यंत उद्योग व्यवसायाच्या वाढीसाठी जर प्रभावी उपयोग झाला, तर रोजगार तर वाढतोच. शिवाय देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळते. आपल्या परिसराचा विकास करण्यात स्थानिक माणसाचा सहभाग वाढतो. परिणामी विज्ञान तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्या देशातील लोकशाही व्यवस्था भक्कम होऊ शकते. काकोडकरांसारख्या शास्त्रज्ञाने लोकशाहीच्या भक्कमपणासाठी उपाय सुचवावा आणि जो अधिक मूलभूत वाटावा यातच त्यांच्या चिंतनाचे रहस्य लक्षात येते. लोकशाही म्हटल्यानंतर त्याची काळजी किंवा ती टिकवण्याची मक्तेदारी फक्त राजकारण्यांकडेच आहे किंवा तिचे भवितव्य राजकीय पक्षांवरच अवलंबून आहे. अशी साधारण समजूत करून दिली जाते. परंतु, विविध क्षेत्रातील तज्ज्ञांच्या लोकशाही संवर्धनाच्या या संकल्पना जर अंमलात आणल्या तर आपला देश निश्चितच वेगाने प्रगती करू शकेल.

### कौतुकास्पद दीक्षांत समारंभ

मुलुंडच्या विद्या प्रसारक संस्थेने अतिशय देखणा हा दीक्षांत समारंभ आयोजित केला. विद्यापीठात ज्या पध्दतीने दीक्षांत समारंभ होतात, तसे अगदी हुबेहूब त्याचेच प्रत्यंतर या समारंभात आले. काकोडकरांसारखे मार्गदर्शक या कार्यक्रमाला लाभल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या हातून प्रमाणपत्र घेताना एका ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदारही होता आले. या संस्थेचे मानद सचिव डॉ. पी. एम. कामथ हेसुध्दा असेच संशोधक आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व आहे. काकोडकर आणि कामथांची मैत्रीदेखील सर्वश्रुत आहे. पदवी स्तरावरच विद्यार्थ्यांमधल्या नैपुण्याला आणि संशोधनाला मान्यता मिळाली पाहिजे आणि अशा संशोधनाच्या संधी ग्रामीण भागापर्यंतही पोहचवल्या पाहिजेत. हा काकोडकरांनी मानलेला विचार विद्यार्थ्यांना नवी दिशा देणारा ठरला. महाविद्यालयाचे प्राचार्य एम.एस राजे यांच्या संकल्पनेतून दीक्षांत समारंभ साकारला गेला, हे यानिमित्ताने स्पष्ट झाले. अन्य महाविद्यालयांमध्येसुध्दा याच पध्दतीने जर अशा दीक्षांत समारंभाचे आयोजन झाले, तर विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभू शकेल. शिक्षण क्षेत्रात तर अशा मूलभूत परिवर्तनाचा श्रीगणेशा लवकर होऊ शकतो. आज विद्यार्थ्यांना विशेषतः दहावी, बारावीपासून ते पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना या ज्ञानयुगात अनेक संधी देण्याची वेळ आलेली आहे. काकोडकर त्याला नॉलेज म्हणतात, हे अगदी योग्य आहे. या अर्थाने ज्ञान प्रसारातले विज्ञान काकोडकरांनी आपल्या भाषणातून अतिशय मर्मज्ञपणे अधोरेखित केले. व्हीपीएम महाविद्यालयाने घेतलेल्या या पुढाकाराबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे.